# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

**जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/जन/ २०४३ /२०२५-२६** **दि. १७/१०/२०२५**

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी**
**जनसंपर्क विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**विषय :-** प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत ..

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये दि.12/10/2025 रोजीच्या वृतपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीचा खुलासा सोबत जोडून देत आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**पाणी पुरवठा व मलनि स्सारण विभाग**

## // खुलासा //

भाईंदरमध्ये नळाच्या पाण्यातुन दुर्गंधी या मथळ्याखाली नवराष्ट्र, पाली गावात पालिकेच्या नळाला गटाराचे पाणी या मथळ्याखाली लोकमत, नागरीकांना गटाराच्या दूषित पाण्याचा पुरवठा या मथळ्याखाली नवशक्ती व मिरा-भाईंदर पालिकेच्या नळातून गटाराचे पाणी या मथळ्याखाली सामना या वृत्तपत्रातांध्ये दि.12/10/2025 रोजी बातमी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने खुलासा सादर करण्यात येतो की, मिरा भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणीपुरवठा होत आहे. पाणी पुरवठा विभागामार्फत दैनंदिन देखभाल दुरुस्तीच्या कामाकरिता विभागनिहाय पथकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर पथकामार्फत पाणीपुरवठा संबंधित तक्रारीचे तातडीने निवारण करण्याची कारवाई करण्यात येते.

भाईंदर पश्चिम येथील उत्तन पाली शांतीनगर या परिसरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर परिसरातील पथकाने जाऊन त्या ठिकाणी वितरण जलवाहिनीची तपासणी केली. तपासणी दरम्यान नाला क्रॉसिंग मध्ये एक अर्धा इंचाचे कनेक्शन तुटलेल्या अवस्थेत आढळले व वितरण जलवाहिनीवर लावण्यात आलेला जीपी जॉईन्ट तो सुद्धा तुटलेला होता. त्यामुळे दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे समजले त्याच दिवशी रात्री 10 वाजेपासून ते सकाळी 4 वाजेपर्यंत ते काम पूर्ण करण्यात आले व नंतर लाईन वॉश करून घेतली. अशाप्रकारे दूषित पाणी संबंधी तक्रारीचे तातडीने नोंद घेऊन तक्रारीचे निवारण करून संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली आहे. दि.12/10/2025 दुपारी 3:00 वाजता सदर परिसरात नियमित पाणी पुरवठा सुरू केला असता पाणी पुरवठा स्वच्छ होत असल्याचे दिसून आले आहे.

शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, दूषित पाणी पुरवठा संबंधी तक्रार असल्यास विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित अधिकारी यांच्या भ्रमणध्वनीवर व्हाट्सअप द्वारे किंवा लघुसंदेश द्वारे तक्रार करता येईल.


**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मीरा भाईंदर महानगरपालिका**

12/10/25

नवराष्ट्र

# भाईंदरमध्ये नळाच्या पाण्यातून दुर्गंधी

## नागरिकांकडून महापालिकेकडे तक्रार दाखल



▶ भाईंदर (वा.) भाईंदर पश्चिमेतील उत्तन, पाली बंदर आणि शांतीनगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्या नळातून गटाराच्या दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत असल्याची गंभीर तक्रार नागरिकांनी केली आहे. या घटनेमुळे परिसरात आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नागरिकांनी तातडीने महापालिकेकडे तक्रार दाखल केल्यानंतर, प्रशासनाने तपासणीसाठी पथक स्थापन केले आहे. प्राथमिक तपासणीत समोर आले आहे की, सदर भागात सुरू असलेल्या रस्ता व गटार बांधकामामुळे पाईपलाईन लिकेज झाल्याची शक्यता आहे. या लिकेजमधून गटारातील पाणी पिण्याच्या पाण्याच्या लाईनमध्ये शिरत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये जुन्या पाईपलाईन कुजल्या असून त्या बदलण्याची मागणी नागरिकांकडून वारंवार केली जाते. तसेच पाणीपुरवठा नियंत्रित करण्यासाठीचे व्हॉल्व दीड ते दोन फूट जमिनीत गाडले गेल्याने गळतीचे प्रमाण वाढले आहे. या गळतीतूनही बाहेरील घाण पाणी पाईपलाईनमध्ये शिरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ उपाययोजना करून शुद्ध पाणीपुरवठा सुरू करण्याची आणि जुन्या पाईपलाईनच्या बदलाची कार्यवाही त्वरित हाती घेण्याची मागणी केली आहे.

पालिकेच्या अभियंत्यांनी या प्रकरणी स्थळ पाहणी सुरू केली असून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात येत आहे, अशी माहिती मिळाली आहे.

शोध घेत होते.

यांना केला आहे.


लोकमत

# पाली गावात पालिकेच्या नळाला गटाराचे पाणी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदरच्या पाली गाव भागात मीरा भाईंदर पालिकेच्या पाणी पुरवठा करणाऱ्या नळांमधून चक्क गटारासारखे काळे दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. पालिकेने दिखाऊपणासाठी लाखोंची उधळपट्टी करण्यापेक्षा नागरिकांना आधी चांगले शुद्ध पाणी द्यावे. आम्ही गटाराचे पाणी प्यायचे का ? असा संतप्त सवाल येथील नागरिकांनी केला आहे.

पाली गाव, शांती नगर भागातील अनेक मच्छिमारांच्या घरातील पालिका नळातून गेल्या काही दिवसांपासून पिण्याच्या शुद्ध पाण्याऐवजी गटाराचे काळे दूषित पाणी येत आहे. त्यामुळे लोकांना पिण्यासह अंघोळीला, जेवण बनवायला, कपडे-भांडी धुण्यास देखील पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे येथील नागरिक हैराण झाले आहेत.



Scanned with CamScanner

नव शक्ति
marathi.freepressjournal.in


# महापालिकेचा लोकांच्या जीवाशी खेळ

## नागरिकांना गटाराच्या दूषित पाण्याचा पुरवठा

भाईंदर : भाईंदर पश्चिमेच्या उत्तन परिसरातील पाली बंदर आणि शांतीनगर भागातील नागरिक व मच्छिमारांच्या घरात महापालिकेकडून पुरवठा होणाऱ्या नळातून गटाराचे दूषित पाणी येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेकवेळा तक्रारी करून देखील महापालिका पाणी समस्याकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

उत्तनच्या पाली बंदर व शांतीनगर भागातील घरोघरी पालिकेच्या नळातून गटाराचे काळेकुट्ट आणि दुर्गंधीयुक्त पाणी येत असून, नागरिकांना पिण्यासह घरातील कामांसाठी बाहेरून महागडे पाणी विकत घेणे भाग पडत आहे. मच्छिमार नेते बर्नड डिमेलो यांनी यावर टीका करत सांगितले की, पाणीपुरवठा विभाग फक्त नवीन पाईपलाइन टाकणे आणि टेंडर प्रक्रियेत मर्यादित राहतो; अनेक ठिकाणी पाईपलाइन जमिनीखाली टाकली तरी अजून जोडलेली नाही, ज्यामुळे सार्वजनिक निधी वाया जात आहे.

स्थानिकांनी संताप व्यक्त करत म्हटले की, लोकांना गटाराचे दूषित पाणी महापालिकेच्या नळातून पुरवणे ही अतिशय गंभीर आणि लाजिरवाणी बाब आहे.



> लोकांनी थोडा विलंब करून वीज किंवा पाणी बिले भरली तरी विभागाचे कर्मचारी दादागिरीच्या स्वरूपात वसुली करतात; परंतु नागरिकांच्या तक्रारींवर कार्यवाही केली जात नाही. अनेक ठिकाणी पाणी बंद-चालू करण्याचे व्हॉल्व जमिनीखाली २-२ फूट खोल आहेत, ज्यामुळे पाणी सोडल्यास बाहेर गळती होते, आणि पाणी बंद करताना बाहेरील घाणपाणी पाईपलाइनमध्ये शिरते.
>
> **- मॅल्कम कासुघर**

Scanned with CamScanner

12/10/25 सामना

# मीरा-भाईंदर पालिकेच्या नळातून गटाराचे पाणी

## उत्तनवासीयांचे आरोग्य धोक्यात



भाईंदर, दि. १२ (सा.वा.) - मीरा-भाईंदर पालिकेच्या नळातून गटाराच्या काळ्याकुट्ट पाण्याचा पुरवठा होत असल्याची संतापजनक बाब उघडकीस आली आहे. धक्कादायक म्हणजे या फेसाळलेल्या पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या दूषित पाण्यामुळे उत्तनवासीयांचे आरोग्य धोक्यात आले असून नागरिकांनी त्याविरोधात संताप व्यक्त केला आहे. पालिकेने तत्काळ उपाययोजना करून शुद्ध पाणीपुरवठा करावा, अशी मागणी यावेळी उत्तनवासीयांनी केली आहे.

भाईंदर पश्चिमेतील उत्तनच्या पाली बंदर व शांतीनगर परिसरात महापालिकेकडून पाणीपुरवठा केला जातो. मात्र गेल्या दोन दिवसांपासून गटाराचे पाणी येत आहे. काळ्याकुट्ट पाण्यामुळे येथील नागरिक हैराण झाले असून त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. केवळ पाणीपुरवठा विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला. ही वाहिनी दुरुस्त करून तत्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक दत्तात्रय जाधव यांनी महापालिकेकडे केली. संतप्त रहिवाशांनी पाणीपुरवठा विभागाला याची माहिती देत जाब विचारला असता अधिकाऱ्यांची पळापळ झाली. प्रभागात रस्ता आणि गटार बांधण्याचे काम सुरू असल्यामुळे लिकेज पाइपलाइनमुळे गटाराचे पाणी येत असल्याचा अंदाज अधिकाऱ्यांनी वर्तवला आहे.

### गळक्या पाइपचा शोध सुरू

गळक्या पाइपलाइनचा शोध घेण्यासाठी अधिकाऱ्यांनी इंजिनीयरसह एका पथकाची रवानगी केले आहे. या पथकाकडून गळक्या पाइपलाइन, गटाराजवळील व्हॉल्व याचा तपास सुरू केला आहे. लवकरच लिकेज शोधून त्यावर उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली


14/10/25

लोकसत्ता.

# स्मशानभूमीत पाण्याची कमतरता

## अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय

**लोकसत्ता वार्ताहर**



**भाईंदर :** मिरा रोड येथील स्मशानभूमीत पाण्याची कमतरता जाणवत असल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. याबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला असून त्वरीत कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

मिरा रोड भागातील नागरिकांच्या अंत्यविधीची सोय करण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने जोगर्स पार्क परिसरात हिंदू स्मशानभूमीची उभारणी केली. यासाठी पालिकेने कोट्यवधी रुपयांचा खर्च केला. स्मशानभूमीत पत्र्यांचे छप्पर, बसण्यासाठी बाके, विद्युत दाहिनी तसेच लाकडांची सोय उपलब्ध आहे. स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी येणारे नागरिक शेवटी स्मशानातून बाहेर पडताना हाता-पायावर पाणी टाकतात. यासाठी प्रशासनाने मुख्य प्रवेशद्वाराजवळ पाण्याचे नळदेखील बसवले आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून या नळांमध्ये पाणी नसल्याची बाब समोर आली आहे. परिणामी स्मशानभूमीत येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. तीन दिवसांपूर्वी पाणी नसल्याची तक्रार काही नागरिकांनी आमदार नरेंद्र मेहता यांच्याकडे केली होती. त्यानंतर प्रशासनाने टँकरद्वारे तात्पुरता पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला होता. तथापि, पुन्हा स्मशानभूमीत पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. दरम्यान हा परिसर नागरी वस्तीपासून काहीसा लांब असल्याने येथे आवश्यक सुविधा उभारण्याकडे प्रशासन विशेष लक्ष देत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

### शटडाऊनचा फटका

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने शहरातील स्मशानभूमींना नळजोडणी उपलब्ध करून दिली असून, पाणी साठवण्यासाठी पाण्याच्या टाक्याही उभारल्या आहेत. मात्र मागील आठवड्यात शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एमआयडीसीच्या वितरणात काही तास शटडाऊन घेण्यात आले होते. परिणामी पाणी वितरणाचे वेळापत्रक बदलल्याने ही समस्या उद्‌भवली आहे. सध्या स्मशानभूमीत आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर यांनी दिली.